# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ २७७ /२०२३ दि.२३/०२/२०२३

(तातडीचे / कालमर्यादित) **स्मरणपत्र-१**

## परिपत्रक

विषय:- विद्यापीठ संलग्नित अशासकीय विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांकडून आकारण्यात येणाऱ्या अनामत रकमेबाबत.

संदर्भ:- १. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.: उशिसं/मवि-१/अनामत रक्कम/२०२३/१०६८ दि. ०६ फेब्रवारी, २०२३

२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र./गो.वि./म.वि.वि.वि./२३६/२०२३ दि. १४/०२/२०२३

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय विना अनुदानित / कायम विना अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमाचे महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे संदर्भ क्र. ०१ च्या पत्रानुसार शैक्षणिक सत्र २०२१-२२ अखेरपर्यंत महाविद्यालयामध्ये विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षण पुर्ण केल्यानंतर शिल्लक असलेल्या अनामत रकमेबाबतची माहीती सादर करण्याबाबत विद्यापीठाचे संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

परंतु बरेच महाविद्यालयांनी आजतागायत उक्त माहिती विद्यापीठात सादर केलेली नाही. संदर्भ क्र. ०१ च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असल्याने सोबत संलग्नित प्रपत्रातील माहिती दि. २८/०२/२०२३ पर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या college.section@unigug.ac.in या ई-मेल आय.डी. वर तसेच हार्ड कॉपीसह तातडीने विद्यापीठात सादर करावे. सदर माहिती विहीत मुदतीत सादर न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

**सहपत्र:- संदर्भीय पत्र**

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

२३/२/२३

(देवेंद्र एम. झाडे)
उपकुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय
आवक क्र. 8653 दि. 9/2/23
जावक क्र. 3321 दि. 13/2/23

1069 9/2/23

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :**mavi.dhepune@nic.in

फोन नं.020/26122119, 26051512, 26130627, 26124639

क्र.: उशिसं/मवि-१/अनामत रक्कम/२०२३/ 1068 दिनांक- .२.२०२३
-6 FEB 2023

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय: विद्यापीठ संलग्नित अशासकीय विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांकडून आकाण्यात येणा-या अनामत रकमेबाबत..**

उच्च शिक्षण विभागाच्याच्या कार्यकक्षेतील, विद्यापीठ संलग्नित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमाशी संबंधीत महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी अनामत रक्कम घेतात. महाविद्यालयाने, संबंधित विद्यार्थ्याचा पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर सदर अनामत रक्कम विद्यार्थ्यांना परत करणे आवश्यक आहे.

तथापी अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर अनामत रकमेची मागणी करत नाहीत अथवा अनामत रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्याबाबत महाविद्यालये काहीही प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे दरवर्षी महाविद्यालयांकडे मोठया प्रमाणात अनामत रक्कम जमा होत असते.

आपल्या विद्यापीठाशी संलग्नित, अशासकीय विना अनुदानित / कायम विना अनुदानित (कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र) महाविद्यालयांकडे, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत शिल्लक असलेल्या अनामत रकमेची माहिती संकलित करुन सोबतच्या प्रपत्रामध्ये **दि. २० फेब्रुवारी २०२३** पर्यंत संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ई-मेल आय.डी. वर सादर करण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

Devendra Zote, VR

प्रत माहितीस्तव: श्री. अमर जालिंदर एकाड- अध्यक्ष, कॉम्स विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य.

प्रपत्र- अ

विद्यापीठाचे नाव -

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंतची शिल्लक अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| | विना अनुदानित महाविद्यालय | कायम विना अनुदानित महाविद्यालय | |
| | | | |